# बहुआयामी मध्यस्ती संकल्पनेचं सूत्र : एका प्राचीन कथेतील घटनेचा मानसशात्रीय आणि सामाजिक अभ्यास

**डॉ. विनय भोळे**
माजी प्राचार्य,
प्राध्यापक - मॉडेल कॉलेज ऑटोनॉमस, डोंबिवली.
**महाराष्ट्र भारत**

राम रावण युध्द अटळ आहे असं दिसत असताना देखिल धर्म व नीतिनियम पाळणाऱ्या प्रभू रामचंद्राने लक्ष्मण, सुग्रीव, जांबुवंत, हनुमान, अंगद अशा सगळ्यांपुढे प्रस्ताव ठेवला, 'आपल्याला एखाद्या वन्य टोळीप्रमाणे युध्द करायचं नाही. जर रावण सीतेला सन्मानाने परत पाठवण्यास तयार असेल तर आपण नाहक युध्द व हानी टाळायला हवी. त्यांनी सीतेला परत पाठवलं तर आपण लंका सोडून परत जाऊ'.

रामाच्या या वक्तव्यावर अनेक युध्दाला उत्सुक योध्दे युध्द टळणार अशा कल्पनेने नाराज झाले. श्रीरामाला स्वतःला देखिल माहिती होतं की, रावण असं सहज शरण येऊन सीतेला सोडून देणार नाही. परंतु, श्रीरामाला कोणताही अयोग्य मार्ग मान्य नव्हता.

सर्वानुमते रावणाकडे जाण्यासाठी वालीपुत्र युवराज अंगदाची निवड करण्यात आली. अंगद राजपुत्र होता. पण, कदाचित लंकादहनाची पार्श्वभूमी असल्याने व शिष्टाई ऐवजी थेट युध्द सुरु होईल, याकरीता हनुमानाचं नाव न ठरवता अंगद यासाठी निवडला गेला. अंगद केवळ राजपुत्र होता असं नाही तर तो अत्यंत हुशार व शूर देखिल होता. त्याला राजधर्म, योध्याचा धर्म आणि दूताचा धर्म ज्ञात होता.

अंगदाने रावणाच्या राजप्रासादाजवळ प्रवेश करताच राक्षसांनी त्याला एकट्याला पाहून त्याची अवहेलना करायला प्रारंभ केला. अंगदाने रागावर नियंत्रण ठेवत कोणाही राक्षसाशी वाद न घालता किंवा युध्द न करता थेट रावणाच्या राजसभेत प्रवेश केला. अत्यंत बुद्धिमान

अंगदाने प्रवेश करताच उपस्थित योध्दे, मंत्री, एकूण उपस्थित मान्यवर आणि त्यांच्याजवळ असलेली अत्युत्तम आणि प्रगत शस्त्रं यांचा अंदाज घेतला.

राजशिष्टाचार पाळून आणि आपण प्रभू रामचंद्रांचा राजदूत या भूमिकेत आहोत तसेच आपण स्वतःही सामान्य दूत नसून राजपुत्र आहोत याचे संपूर्ण भान ठेवत अंगदाने स्वतःची ओळख करून दिली. ओळख करून देताना त्याने सत्य सांगितलं तरीही उपस्थित सर्वांचं मनोबल खच्ची करण्याचा संपूर्ण प्रयत्न केला. तसेच त्याने रावणाचा भर सभेत अपमान करण्याची संधी देखिल सोडली नाही.

अंगद त्याचा पिता वानरराज वालीप्रमाणे अत्यंत धाडसी आणि माता ताराप्रमाणे अतिशय बुद्धिमान होता. त्याच्यात व्यवस्थापकीय कौशल्याचा एक गुण दिसतो, आपल्या पातळीखाली न उतरण्याचा (to maintain dignity). त्याने स्वतःचं नेमून दिलेलं काम (assigned task) लक्षात ठेवलं आणि राजमहालात प्रवेश करताना त्याची अवहेलना करणाऱ्या राक्षसांना बेदम मारण्याची इच्छा त्याने नियंत्रणात ठेवली (Self-control or Control on annoyance). स्वतःचा आब (self-dignity) ठेवत आवश्यक त्या व्यक्ती आणि त्यांच्याजवळ असलेल्या शस्त्रांचं त्याने निरीक्षण केलं (observation of opponent's capacity), रावणाच्या निकटवर्तीय योध्यांचा अंदाज लावला आणि सगळ्यात महत्वाचं स्वतःची ओळख करून देताना रावणाचा अपमान (tarnishing the image) करून सगळ्यांचं मनोधैर्य (to make down the morale) कसं कमी होईल याचा विचार केला.

अंगद रावणाला म्हणाला, 'हे लंकेश्वर, अनेक वर्षांपूर्वी तू अहंकाराने वानरराज वालीची शेपटी पकडण्याचा प्रयत्न केला होतास, वालीने तुला शेपटीत गुंडाळून संपूर्ण किष्किंधा नगरीत फिरवलं होतं, वानरांनी तुझी वालीच्या शेपटीत अडकलेलं खेळणं अशी निर्भत्सना केली होती, मी त्या वीर वानरराज वालीचा पुत्र अंगद.' या स्वतःच्या ओळखीतून त्याने रावणाला त्याची जागा दाखवून दिली तसेच स्वतःचं महत्व अधोरेखित केलं.

अंगदाने त्याची भूमिका, काय बोलावं काय बोलू नये याचा संपूर्ण विचार केला होता. त्याने थेट रामाचा उल्लेख केला नाही. त्याने गोष्टीरूप संभाषण सुरु करताना म्हटलं, 'अनेक वर्षांपूर्वी हैहय कुळातील सम्राट कार्तवीर्य अर्जुनानं आपल्या सहस्त्र बाहूंनी नदीचा प्रवाह

अडवला होता ज्यामध्ये शिवपूजेसाठी रावणा, तू गोळा केलेली फुलं आणि पत्री वाहून गेल्या होत्या. त्याबद्दल कार्तवीर्य अर्जुनानं, रावणा, तुझा उपहास करून अपमान केला होता. त्या कार्तवीर्याचा वध भगवान परशुरामाने केला. ज्या अजिंक्य परशुरामाने ईश्वरस्वरूप श्रीरामाचा एक महान योद्धा म्हणून स्वीकार केला त्या श्रीरामाचा मी सेवक आणि दूत आहे.'

णाक्ष अंगदाने दोन्ही परिचयांत रावणाच्या मानहानीची संधी सोडली नाही. अजून काहीच बोलणं सुरु झालं नव्हतं तरीही त्याने राजसभेची पकड घेतली. त्याला टाळणं अथवा हाकलून देणं रावणाला शक्य नव्हतं, कारण रावणाला अवमान सहन न झाल्याने त्याने पुढचं काही ऐकून घेतलं नाही असा सर्वांचा समज होईल अशी परिस्थिती अंगदाने आपसूकच निर्माण केली.

अंगद पुढे रामाचा संदेश सांगताना म्हणाला, 'अयोध्याचा राजपुत्र श्रीराम आणि त्याचा पराक्रमी बंधू लक्ष्मण ससैन्य लंकेच्या वेशीबाहेर युद्धासाठी सज्ज आहेत. तो निर्णायक युध्द करण्यास तयार होऊन आला आहे. तू पापबुद्धीनं रामाची पत्नी पळवून आणली आहेस. अजून वेळ गेलेली नाही. सीतेची माफी मागून, श्रीरामाला शरण जाऊन तू सीतेला सन्मानाने परत पाठव. तुझ्यासारख्या राजाने केवळ स्वतःच्या फायद्याचा, लालसेचा आणि वासनेचा विचार करणं योग्य नाही. नाहक निष्पाप लोकांचा बळी या युद्धात जाईल. अजूनही युध्द टाळणं केवळ तुझ्या हातात आहे.'

लागोपाठ तीन वेळा अंगदाने केलेला भरसभेतला अपमान सहन न होऊन संतापाने रावण म्हणाला, 'वानर एकत्र करून त्याचं सैन्य होत नसतं. माकडांना पकडून खेळ करतात. तू दशानन रावणासमोर उभा आहेस. वनवासी झालेले आणि स्वतःच्याच राज्यातून वनवासात पाठवलेले दोन सन्यस्त भाऊ आणि शस्त्रविहीन वानर बलाढ्य रावणाचं कोणतंही नुकसान करू शकत नाहीत. रावण सर्वश्रेष्ठ आहे.'

रावणाच्या मनात निर्माण झालेला अहंकार (balloon of ego) लक्षात घेऊन अंगद त्याची मानहानी करण्याची अजून एक संधी सापडल्याच्या उत्साहात म्हणाला, 'हे रावणा, तू श्रीराम आणि लक्ष्मण अथवा सुग्रीव आणि हनुमान यांच्या शक्तीचा विचारही करू शकत

नाहीस. मी केवळ एक दूत आहे. या क्षणी माझा जमिनीवर रोवलेला डावा पाय जरी कोणी वीर राक्षसाने हलवला तरीही मी तुझं सामर्थ्य मान्य करेन.'

अंगदाने डावा पाय जमिनीवर घट्ट रोवून सगळ्यांनाच आव्हान दिलं. राजसभेतील राक्षस त्याचा पाय हलवण्यासाठी एकेक करून पुढे येऊ लागले. गुढघ्यावर बसून ते प्रयत्न करत होते. कोणालाही ते जमलं नाही तेव्हा रावण स्वतः त्याचा पाय बाजूला करण्याच्या प्रयत्नात पुढे येऊन अयशस्वी झाला.

इथे केवळ अंगदाने रावण आणि अन्य राक्षसवीरांना ललकारलं नाही तर त्याच्या शक्तीचा व सामर्थ्याचा अंदाज त्यांना देऊन त्यांच्या नकळत त्यांना आपल्यासमोर झुकवून पाय धरायला लावलं. रावण काहीही ऐकण्याच्या तयारीत नव्हता. त्याने अंगदाला रामासाठी संदेश पाठवला, 'हा दशानन रावण केव्हाही युद्धासाठी तयार आहे. विश्वविजेता रावण सहजपणे राम, लक्ष्मण, वानर सैन्याचा संहार करेल'.

रावणाचा पिता सुमाली, माता केकसी, महामंत्री माल्यवान, महाराणी मंदोदरी या सगळ्यांनी रावणाला संधी म्हणजेच सलोखा किंवा तह करण्याचा व अनावश्यक रक्तपात थांबवण्याचा सल्ला दिला. पण ते सगळे प्रयत्न व्यर्थ गेले.

वाल्मिकी रामायणात जे राक्षस अंगदाचा पाय उचलायला येतात त्यांना तो सरळ लाथेने उडवून लावतो, असा उल्लेख आहे. उत्तर प्रदेश, बिहार व अन्य उत्तर हिंदुस्थानातील भागात रामलीला या नाट्य प्रकारात अंगद राक्षसांना आणि रावणाला देखिल त्याचा पाय उचलून दाखवण्याचं आव्हान देतो पण ते कोणालाही जमत नाही.

शिष्टाईची दोन प्राचीन उदाहरणं आपल्याला ज्ञात आहेत. श्रीकृष्णानं कुरु राजसिंहासनापुढे केलेली शिष्टाई आणि अंगदाने रावणासमोर केलेली शिष्टाई. श्रीकृष्णाला बंदी बनवण्याचे आदेश दुर्योधनाने दिले होते पण श्रीकृष्णाचं विश्वरूपदर्शन पाहून पुढे कोणाची काही बोलायची प्रज्ञाच नव्हती. तर या ठिकाणी बंदी न होता अंगद त्याच्या शक्ती आणि सामर्थ्याने आपली सुटका करून घेतो.

अयोध्येच्या कल्याणाचा विचार करणारा श्रीराम आणि केवळ स्वतःच्या सुखाचा स्वार्थी विचार करणारा रावण जसे काही व्यवसायाचा आणि संपूर्ण कंपनीचा विचार करणारा व्यवस्थापक आणि केवळ स्वतःच्या पगाराचा आणि फायद्याचा विचार करणारा स्वार्थी कर्मचारी अश्या प्रकारचा आहे.

सल्लागारांचा सल्ला आणि विचार अव्हेरणारा रावण त्याच्या अहंभावात आणि स्वलांगुलचालन यातच विनाशाकडे गेला. श्रीरामाने मात्र अंगदाला पाठवून रावणाला समजावून सांगून आपला धर्म पाळला. हाच पापी रावण आणि मर्यादापुरुषोत्तम श्रीराम यात फरक होता.

अंगद त्याचं काम मात्र योग्य प्रकारे करून गेला. रामाने समजावण्यास दूत पाठवला आहे, याचा अर्थ राम समजूतदार होता हे अंगदानं स्पष्ट केलं, त्याने वालीचं उदाहरण देऊन स्वतःचं महत्व आणि रावणाचं अपयश सगळ्यांसमोर मांडलं, कार्तवीर्य अर्जुन, परशुराम आणि श्रीराम यांचं उदाहरण देऊन रामाचं श्रेष्ठत्व परत एकदा अधोरेखित केलं, राम हे संभाव्य युध्द टाळू शकतो हे सांगून सगळी अयोग्य बाजू केवळ रावणाची आहे आणि राम कसा धर्मपरायण आहे बरोबर मांडलं, ते होतं ना होतं तर रावणाच्या दरबारातील सगळ्यांना विचित्र पैज लावून आपल्या पायाशी यायला लावलं, परिणामस्वरूप रावणाचे माता, पिता, पत्नी, मंत्री सगळेच रावणाची अवहेलना करून त्याची बाजू अयोग्य आहे हे पटवून देऊ लागले. यांत अंगदाने व्यवस्थापन (management) आणि मानसशास्त्र (Human psychology) यांचा पुरेपूर वापर केलेला दिसतो. आजच्या जगातही अंगदासारखी चाणाक्ष तज्ज्ञ व्यवहारचतुर माणसं परराष्ट्र खात्यासाठी योग्य ठरतात कारण त्यांना शिष्ठाईतलं मर्म उमगलेलं असतं.

## संदर्भ:

१. प्राचीन चरित्रकोश - म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, भारतीय चरित्रकोश मंडळ, शिवाजीनगर, पुणे- ४, १९६४.

२. महाभारताची चिकित्सक आवृत्ती खंड १ ते २२- भांडारकर प्राच्यविद्या संस्था, भांडारकर मार्ग, पुणे - ४.

३. महाभारताची गूढ रहस्ये : कवीश्वर ३४, जानकीनगर, इंदोर (मध्य प्रदेश )- ४५२००१.

४. महाभारताचा उपसंहार : ले. भारताचार्य चिं. वि. वैद्य - वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११ ०१६.

५. श्रीकृष्णचरित्र: ले. भारताचार्य चिं. वि. वैद्य - वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११ ०१६.

६. महाभारत : संपादन - प्रा. न. र. फाटक

७. महाभारत : संपादन - प्रा. भालबा केळकर =

८. व्यासपर्व : दुर्गा भागवत, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई - ४, आवृत्ती १९६२.

९. गर्गसंहिता - भांडारकर इन्स्टिटयूट - पुणे - ४.

१०. हरीवरदा : श्रीकृष्ण कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३, शनिवार पेठ, पुणे- ४११०३०.